# अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनींना वार्षिक सहा लाखांचे पॅकेज

## पुण्याच्या केपीआयटी टेक्नॉलॉजीने केली दोघींची निवड

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इ ॲण्ड टीसीच्या दोन विद्यार्थिनींना पुण्याच्या केपीआयटी टेक्नॉलॉजी कंपनीने वार्षिक सहा लाख रुपयांचे पॅकेज दिले असून आत्तापर्यंत झालेल्या निवडीमध्ये हे पॅकेज सर्वाधिक मानले जात आहे.

पुण्याच्या केपीआयटी टेक्नॉलॉजी कंपनीने के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखत घेण्यात आली. यामध्ये महाविद्यालयाच्या मास्टर ऑफ इंजिनिअरिंगमधील इ ॲण्ड टीसीच्या विद्यार्थिनी पल्लवी कल्याणसुंदरम् व रिचा यादव यांनी याच कंपनीमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले होते. या दरम्यान त्यांनी एक प्रोजेक्टही सादर केला होता. त्यामुळे कंपनीने पल्लवी व रिचा यांची निवड सहा लाख रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर निवड केली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या हस्ते पल्लवी व रिचा यांना कंपनीच्या वतीने वार्षिक पॅकेजचे ऑफर लेटर देण्यात आले. यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद शहाबादकर, डॉ. एस. एस. साने, डॉ. डी. एम. चांदवडकर उपस्थित होते.



**नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस मुलाखतीमध्ये सहा लाखांचे वार्षिक पॅकेज मिळालेल्या पल्लवी कल्याणसुंदरम्, रिचा यादव यांच्यासमवेत डॉ. प्रमोद शहाबादकर,**